# संपादकिय

## शिवसेना आमदार अपात्रतेचा निकाल लांबणार?

राज्यातील महाविकास आघाडी सरकार मध्ये फुट पाडत शिवसेनेच्या शिंदे गटाने भाजप बरोबर हातमिळवणी करत, सरकार स्थापन केले. त्यानंतर शिवसेना कुणाची व आमदार अपात्रता प्रकरण न्यायालयात गेले. तर शिवसेना कुणाची याचा निकाल मात्र निवडणूक आयोगाने शिंदे गटाच्या बाजूने देत ठाकरे गटाला झटका दिला. तर न्यायालयानेही आमदार अपात्रता प्रकरणी सदरचा निकाल हा विधानसभा अध्यक्ष देतील असे सांगत वेळेचे बंधन मात्र दिले ल्याने दुसरा झटका दिला. मात्र यावर ठाकरे गटाने न्यायालयात घेतली. याठिकाणी मात्र ठाकरे गटाला न्यायालयाने दिलासा देत विधानसभा अध्यक्ष यांनी लवकरात लवकर निकाल घेण्याचे आदेश देत वेळापत्रक द्या असे सुनावल्याने, अखेर कार्यवाही सुरू झालीये. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या दिल्ली दौऱ्यानंतर आता आमदार अपात्रता प्रकरणाच्या सुनावणीचं वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. १३ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबरपर्यंत या कालावधीत प्रकरणावरील सुनावणी चालणार आहे. त्यामुळे लवकर निर्णय घेण्याची मागणी करणाऱ्या शिवसेनेला (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अजून बरीच प्रतिक्षा करावी लागणार आहे. यामध्ये १३ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबर या कालावधीत युक्तिवाद होणार आहे. २३ नोव्हेंबरनंतर दोन आठवड्यांनी अंतिम सुनावणी होणार आहे. सर्व याचिकांच्या एकत्रीकरणावर (क्लबिंग) सुनावणी १३ ऑक्टोबर रोजी होणार आहे. १३ ते २० ऑक्टोबर दरम्यान विधिमंडळात शिवसेनेच्या दोन्ही गटांनी एकमेकांना दिलेल्या कागदपत्रांची छाननी केली जाणार आहे. सर्व याचिकांचे एकत्रीकरण (क्लब) करायचे की नाही यावर २० ऑक्टोबर रोजी निकाल दिला जाईल. याशिवाय २० ऑक्टोबर रोजी कोणत्याही गटाला काही अतिरिक्त कागदपत्रे सादर करायची असल्यास संधी दिली जाईल. दोन्ही गट २७ ऑक्टोबर रोजी लेखी म्हणणे मांडतील. ६ नोव्हेंबरपर्यंत दोन्ही गट आपली बाजू मांडतील आणि दावे-प्रतिदावे करतील. दोन्ही गटांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर १० नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे. २० नोव्हेंबर रोजी दोन्ही गटांच्या साक्षीदारांची यादी सादर केली जाईल. २३ नोव्हेंबर रोजी साक्षीदारांची उलटतपासणी होणार आहे. सर्व पुरावे तपासल्यानंतर पुढील दोन आठवड्यांत अंतिम सुनावणी होणार आहे. २३ नोव्हेंबरपासून उलट चौकशी सुरू होईल आणि पुढील तारखा दोन्ही गट आणि त्यांच्या वकिलांच्या सोयीनुसार दिल्या जातील. आठवड्यातून किमान दोन वेळा उलट चौकशी सुनावणी घेतली जाईल. पुरावे सादर केल्यापासून दोन आठवड्यांनंतर याचिका अंतिम सुनावणीसाठी सूचीबद्ध केली जाईल.

दोन्ही गटांना हे लक्षात घ्यावे लागेल की वर निश्चित केलेले वेळापत्रक शक्य तितके पाळले जाईल आणि केवळ अपरिहार्य परिस्थितीत स्थगित केले जाईल किंवा बदलले जाईल आणि कोणतेही बदल असल्यास, गटांना अगोदर सूचित केले जाईल.शिंदे आणि ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर नार्वेकर यांनी शिंदे गटाच्या आमदारांविरुद्धच्या अपात्रतेच्या याचिकांवर १३ ऑक्टोबर रोजी अधिकृत सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सध्या तरी आमदार अपात्रता निकाल लांबणीवर पडला आहे.




# चाळीस दिवसांचा वेळ सरकारला दिला आहे : मनोज जरांगे पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांनी आपण आरक्षण घेतल्याशिवाय शांत बसणार नाही असे म्हणाले आहेत. तसेच सरकारने टिकणारे आरक्षण देण्यासाठी चाळीस दिवसांचा वेळ दिला आहे. हा वेळ सरकारने मागितला आहे. सरसकट मराठा समाजाला आरक्षण देतो असं त्यांनीच सांगितलं आहे. गिरीश महाजन यांनीही आम्हाला हेच आश्वासन दिलं की टिकणारं आरक्षण देणार आहोत. सरकारने मागितलेला वेळ आम्ही त्यांना दिला आहे असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. आम्ही वेळ दिला आहे आता टिकणारं आरक्षण द्या असं मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. काही वेळापूर्वीच त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केले. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा



मनोज जरांगे पाटील

आरक्षणाच्या मागणीसाठी २९ ऑगस्टपासून बेमुदत उपोषण आंदोलन सुरु केलं होतं. त्यानंतर बऱ्याच चर्चा आणि वाटाघाटी झाल्यावर उपोषण मागे घेण्यात आलं. मात्र जालना येथील आंतरवली सराटी गावात त्यांचं आंदोलन सुरुच आहे. मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळेपर्यंत मी घराचा उंबराही चढणार नाही असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. त्यानंतर आता त्यांनी पुन्हा एकदा टिकणारं आरक्षण सरकारने द्यावं असंही म्हटलं आहे.

महसूल प्रशासनाने जवळपास ६५ लाख अभिलेखांची तपासणी केली आहे. त्यामध्ये केवळ ५ हजार कागदपत्रांमध्ये कुणबी नोंदी आढळल्या आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणाबाबत सरकार काय निर्णय घेणार याबाबत चर्चा सुरू आहे. यावर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे म्हणाले, ही कागदपत्रं सरकारला केवळ पुरावा म्हणून आवश्यक आहेत. ५ हजार कुणबी नोंदी पुराव्यासाठी खूप आहेत. मी पूर्वीपासून सांगतोय आणि आताही सांगतोय की, मराठ्यांना कुणबी दाखले देण्यासाठी कसल्याही पुराव्याची गरज नाही. २००४ सालच्या जीआरनुसार, मराठा आणि कुणब्यांना सरसकट प्रमाणपत्रं देता येते

# सांगलीत अनुसूचीत जाती जमाती महापरिवर्तन मेळाव्याचे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** येथे ३० सप्टेंबर २०२३ रोजी कल्पद्रूम क्रिडांगण, नेमिनाथ नगर येथे अनुसूचीत जाती जमाती महापरिवर्तन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सांगली जिल्ह्यातील १०६ जाती व जमाती यांच्या न्याय हक्कासाठी १०६ जाती जमातींच्या समाजप्रतिनीधी व समाजबांधवांना एकत्र करून भव्य दिव्य अनुसूचीत जाती आणी जमाती महापरिवर्तन मेळावा-२०२३ या ठिकाणी संपन्न होणार आहे. तरी सांगली जिल्ह्यातील सर्व अनुसूचीत जाती-जमातीच्या बंधू-भगिनींनी उपस्थित राहून महापरिवर्तनाचे साक्षीदार व्हावे असे आवाहन विवेक कांबळे व राजेंद्र खरात यांनी केले आहे.




# कांदाप्रश्न सोडविण्यासाठी २९ ला दिल्लीत बैठक

माणदेश एक्सप्रेस न्यूज

मुंबई : कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात नाफेड आणि 'एनसीसीएफ' यांनी थेट शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करावी, अशी लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी दिल्ली येथे २९ सप्टेंबरला बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. दिल्ली येथील बैठकीस राज्य मंत्रिमंडळ सदस्यांचे शिष्टमंडळ उपस्थित राहील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

कांदा उत्पादक शेतकरी, व्यापाऱ्यांसह ग्राहक वर्गाच्याही हिताचे रक्षण करण्याचा राज्य शासनाचा सर्वतोपरी प्रयत्न आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आणि ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी लिलाव बंदीचा निर्णय मागे घेऊन तातडीने कांदा खरेदी सुरू करावी, असे आवाहन केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्यासह उपस्थित मंत्रिमहोदयांनी केले.

नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी पुकारलेल्या बंदच्या पार्श्वभूमीवर कांदा उत्पादक शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासंदर्भात केंद्रीय मंत्री श्री. गोयल व उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या उपस्थितीत मुंबईतील सह्याद्री



**मुंबई : नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी पुकारलेल्या बंदच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली. बैठकीस उपस्थित मान्यवर**

शासकीय अतिथीगृह येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कृषी मंत्री धनंजय मुंडे, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे, पणन मंत्री अब्दुल सत्तार, आमदार सर्वश्री हिरामण खोसकर, राहुल आहेर, नितीन पवार, दिलीप बनकर, ॲड. माणिकराव कोकाटे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आशिष शर्मा, कृषी आयुक्त सुनील चव्हाण (व्हीसीद्वारे), नाशिक जिल्हाधिकारी जलज शर्मा (व्हीसीद्वारे), पणन महामंडळाचे संचालक केदार जाधव, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, नाफेड नाशिकचे अधिकारी निखिल पाडदे, नाफेड मुंबईचे अधिकारी पुनित सिंह, लासलगाव बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश डमावत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत देवरे, देवळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बापू देवरे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष खंडू देवरे, यज्ञेश कडासी, तसेच नांदगाव, उमराणा, येवला, देवळा, लासलगाव, पिंपळगाव या कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी, व्यापारी आदी उपस्थित होते.

केंद्र शासनाने नाफेड आणि 'एनसीसीएफ'मार्फत २ हजार ४१० रुपये प्रति क्विंटल दराने २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचा घेतलेला निर्णय कांदा उत्पादक शेतकरी आण ग्राहक या दोघांसाठीही फायद्याचा ठरला. परंतु, नाफेड आणि 'एनसीसीएफ'मार्फत खरेदी केलेला कांदा इतर राज्यातील खासगी व्यापाऱ्यांना कमी दरात मिळत असल्याने, राज्यातील व्यापाऱ्यांनाही त्यांचा कांदा खरेदीपेक्षा कमी दरात विकावा लागत होता. यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होऊ लागल्याने त्यांनी नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांद्याचे लिलाव बंद केले होते. त्याचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसत होता. त्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आज सकाळी मंत्रालयात आणि सायंकाळी सह्याद्री अतिथीगृह येथे सलग दोन बैठका आयोजित करुन हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

उपमुख्यमंत्री श्री. पवार बैठकीत मार्गदर्शन करताना म्हणाले की, कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. देशांतर्गत कांद्याचे दर नियंत्रणात राहण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून २ हजार ४१० रुपये प्रतिक्विंटल दराने नाफेड आणि एनसीसीएफ मार्फत २ लाख टन कांदा खरेदीचा निर्णयही केंद्र शासनाने घेतला होता. दोन्ही यंत्रणांमार्फत अत्यंत कमी प्रमाणात खरेदी करण्यात आली असून खरेदीची मुदत १० सप्टेंबरला संपली आहे. त्यातच नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात बंद पुकारल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आज सकाळी मंत्रालयात कांदा व्यापाऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्याचे आणि तोडगा निघेपर्यंत कांदा खरेदी व्यवहार सुरू ठेवण्याचे आवाहन केले होते.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






# परिस्थितीशी असणारा संघर्ष टाळण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही : प्रा.आर.एस.चोपडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** जन्मजात मिळालेल्या दारिद्र्यावर विजय मिळविण्यासाठी संस्कारमय शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे स्पष्ट मत महाराणीदेवी अहिल्याबाई होळकर एज्युकेशन सोसायटी सांगलीचे चेअरमन प्रा.आर.एस.चोपडे सर यांनी व्यक्त केले. ते म्हसवड ता.माण येथील ज्ञानवर्धिनी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या ठिकाणी विद्यार्थी-शिक्षक-पालक सहविचार सभेत मार्गदर्शनपर बोलत होते.



म्हसवड : पालक सभेला मार्गदर्शन करताना प्रा.आर.एस.चोपडे सर

या सहविचार सभेसाठी म्हसवड नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष दिपक बनगर, महेश कांबळे, संस्थेचे संचालक लुनेश विरकर, प्राचार्य जी.डी.मासाळ, आर.टी.काळेल, एन.आय.एस.कोच महालींग खांडेकर आदीसह शिक्षक,पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमांच्या सुरुवातीला गणेशोत्सवा निमित्त विद्यालयात घेतलेल्या रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी क्रीडा स्पर्धेत सुयश संपादन करणार्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.पालक सभेला संबोधित करताना प्रा.चोपडे सर यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका, जीवनविद्येच्या ज्ञानाचे सार असणार्या विश्वप्रार्थनेचे महत्व व हीरक महोत्सवी सांगता समारंभ कार्यक्रमाचे निमंत्रण आदी विषयांवर पालकांना सखोल मार्गदर्शन केले. विद्यालय राबवित असलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

प्रास्ताविक प्राचार्य जी.डी.मासाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या विरकर यांनी केले तर आभार आर.टी.काळेल यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# वृत्तपत्र विक्रेत्यासाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नाझरे/वार्ताहर :** ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता वृत्तपत्र विक्रेता आपली सेवा चोख बजावत असून त्यांनी कोरोना काळातही फार मोठे योगदान दिले आहे. याची दखल घेऊन वेदांत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल तर्फे सांगोला शहर व तालुक्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेता व त्यांच्या कुटुंबीयांसाठी पत्रकार संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सतीश सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार २९ सप्टेंबर रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत मोफत सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन केले असल्याचे संघटनेचे तालुकाध्यक्ष रविराज शेटे यांनी सांगितले.




सदर शिबिरात सीबीसी, बीपी, रक्तातील साखर, महिलांचे हिमोग्लोबिन, छातीचे, पोटाचे विकार व इतर सर्व आजारावर निदान व उपचार मोफत करण्यात येणार आहेत. तरी शहर व तालुक्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांनी या मोफत योजनेचा लाभ घेण्यासाठी शुक्रवार २९ सप्टेंबर रोजी कुटुंबासह वेदांत हॉस्पिटल सांगोला येथे हजर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भाजपाला आगामी काळात भगदाड पडणार : नाना पटोले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भाजपाला आगामी काळात भगदाड पडणार आहे असे वक्तव्य काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, भाजपाचं राजकारण हे जातींमध्ये तेढ निर्माण करणारे आहे. तसेच लवकरच दुसऱ्यांची घरं फोडणारी भाजपा फुटणार असून भाजपाला मोठं भगदाड पडणार आहे असे नाना पटोलेंनी म्हटले आहे.


नाना पटोले

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, सगळ्याच समाज बांधवांना माझी एक विनंती आहे की भाजपाने सामाजिक तेढ निर्माण करण्याचं जे बीज रोवलं होते त्यात ते यशस्वी झाले. ते कुणालाही काहीही देऊ शकत नाहीत ते फक्त वाद निर्माण करतात. त्यांच्या आश्वासनांना भुलू नका. संवैधानिक व्यवस्थेत ज्या गोष्टी आहेत त्या अतिशय क्लिअर आहेत. भाजपा सत्तेसाठी काहीही करु शकते. धर्मांमध्ये, जातींमध्ये भांडण लावू शकते. हे त्यातलंच एक चित्र आहे. २०१४ पासून हेच सुरु आहे. जे बीज लावलं त्याचे काटेरी वृक्ष झाले आहेत. समाज बांधवांमध्ये द्वेष वाढतो आहे, याचं कारण भाजपा आहे असं नाना पटोलेंनी म्हटले आहे.

# मनोज जरांगेंच्या मागणीला आमचा विरोध : विजय वडेट्टीवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मराठा आरक्षणाची मागणी करत १६ दिवस बेमुदत अन्नत्याग उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांना मुख्यमंत्र्यांनी आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याचं आश्वासन दिल्यानंतर जरांगे यांनी उपोषण मागे घेतलं. परंतु, मनोज जरांगे पाटील यांनी सरकारकडे मांडलेल्या मागण्या अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत. जरांगे यांच्या आरक्षणाच्या प्रमुख मागणीला ओबीसी समाजातून विरोध होत आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांच्या या मागणीला ओबीसी समाजाकडून विरोध होत आहे. मराठा समाजाला आरक्षण द्यावं, परंतु, ते देत असताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये, अशी मागणी ओबीसी समाजाने केली आहे.या मागणीसाठी अनेक ओबीसी संघटनांचे पदाधिकारी आंदोलन करत आहेत. दरम्यान, काँग्रेस नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीदेखील अशीच मागणी केली आहे.


विजय वडेट्टीवार

विजय वडेट्टीवार म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणानंतर मागणी केली आहे की संपूर्ण मराठा समाजाला ओबीसीतून जातप्रमाणपत्र (कुणबी) दिले जावे. जरांगे यांची ही मागणी संविधानिक नाही. मराठा समाजाला आरक्षण द्यायचंच असेल तर, त्यांच्यासाठी वेगळा प्रवर्ग करून आरक्षण द्या. त्याला आमचा कोणाचाच विरोध नाही. परंतु, ओबीसीतून आरक्षण देण्याला आम्ही महाराष्ट्रातील ओबीसी नेत्यांनी विरोध केला आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले, मराठा समाजाला वेगळा प्रवर्ग करून आरक्षण दिल्यास त्याला आमचा विरोध नाही, अशा आरक्षणाला विरोध असण्याचं कारणच नाही. सध्या देशात आणि राज्यात बहुमतातलं सरकार आहे. त्यांनी दोन्ही ठिकाणी मराठा आरक्षणासंदर्भात निर्णय घ्यावा. आमचा त्या निर्णयाला पाठिंबा असेल.

# रखडलेल्या विमानतळांची कामे मार्गी लावण्यासाठी खाजगी कंपनीकडील पाच विमानतळांचा ताबा ‘एमआयडीसी’ने घ्यावा – उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई :** राज्यातील नांदेड, लातूर, धाराशिव, यवतमाळ आणि बारामती या विमानतळांचे सक्षमीकरण करून विमानसेवा सुरू होण्याच्या दृष्टीने ही पाचही विमानतळे खाजगी कंपनीला भाडेपट्ट्याने चालविण्यास देण्यात आली होती. मात्र, गेल्या १४ वर्षांत या ठिकाणी विमानसेवा सुरु होऊ शकली नसल्याने त्यांचा ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने घ्यावा. यासाठीची प्रक्रिया तातडीने सुरु करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केलेल्या विमानतळांबाबत आज मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस उद्योग मंत्री उदय सामंत, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव (विमान चालन) दीपक कपूर, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आशिष शर्मा, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडेय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा आदी उपस्थित होते.

‘एमआयडीसी’ने विकसित केलेल्या विमानतळांच्या सद्यस्थितीचा आढावा घेताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्यातील दळणवळणाचा विकास करतानाच छोट्या शहरांमध्ये विमानसेवा सुरु करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. महानगरातील विमानतळांवरील भार कमी करण्यासाठी राज्याच्या उर्वरित भागात विमान सेवा सुरु झाली पाहिजे. विमानतळासाठी जागा उपलब्ध असणाऱ्या ठिकाणी पायाभूत सोयीसुविधा उभारल्या पाहिजेत. काही ठिकाणी विमानसेवा सुरू आहेत, त्यांची वारंवारिता वाढविली पाहिजे. काही विमानतळांवर धावपट्ट्या वाढवल्या पाहिजेत, तर काही ठिकाणी नाईट लँडिंगची सुविधा सुरु केली पाहिजे. यामुळे वाहतूक कोंडीसारख्या समस्या कमी होण्यास मदत होईल. तसेच नागरिकांना परवडणाऱ्या दरात विमान प्रवास करता येईल.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नांदेड, लातूर, धाराशिव, यवतमाळ आणि बारामती या विमानतळांवर पायाभूत सुविधांची उभारणी सुरु केली होती. या प्रक्रियेला वेग देण्याच्या दृष्टीने आणि विमानतळांच्या सक्षमीकरणासह हवाई सेवा सुरु करण्यासाठी या पाच विमानतळांचे हस्तांतरण खासगी कंपनीकडे करण्यास वर्ष २००९ मध्ये परवानगी देण्यात आली होती. परंतु, आज त्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. त्यामुळे ही पाचही विमानतळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आपल्या ताब्यात घ्यावीत, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.












# फॅबटेक पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** श्रीराम पॉलिटेक्निक पानिव येथे राज्यस्तरीय टेक्निकल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. प्रोजेक्ट आयडिया या स्पर्धेत डिप्लोमा मेकॅनिकल विभागातील मयुर आतकर, शुभम बंडगर, अजित मासाळ व आकाश काळेल या विद्यार्थ्यांच्या ग्रुपने द्वितीय क्रमांक पटकावला.








रिमोट कंट्रोल द्वारे औषध फवारणी मशिन या प्रोजेक्ट साठी विद्यार्थ्यांना सदर चे पारितोषिक मिळाले असून विद्यार्थ्यांना प्रा.अरुण लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील रणजित बागल व आधिकराव गडदे या विद्यार्थ्यांनी देखील पोस्टर प्रेझेन्टेशन या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला. इंटरनेट ऑफ थिंग्स (आयओटी)या विषयावर बनविलेल्या पोस्टर मध्ये स्मार्ट सिटी, इरिगेशन सारख्या ठिकाणी आयओटी चा वापर कसा होतो हे चित्राच्या माध्यमातून दर्शवले होते.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रूपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. अमित रुपनर, कार्यकारी संचालक दिनेश रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय अदाटे, संचालक डॉ.डी.एस.बाडकर, पॉलिटेक्निक चे प्राचार्य डॉ. शरद पवार, मेकॅनिकल विभागाचे प्रमुख प्रा.दत्तात्रय नरळे, इलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रमुख प्रा.महेश वाळूंजकर यांनी अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# युतीत ताकद दाखवावी लागेल : प्रफुल्ल पटेल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भाजपासह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा गट युतीत सामील झाल्याने आगामी लोकसभा आणि विधानसभेच्या जागेवरून पेच निर्माण झाला आहे. कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार? यावरून तर्क वितर्क लढवले जात आहेत. या जागांसाठी तिन्ही पक्षांकडून रणनीती आखली जात आहे. परंतु, अजित पवार गटाचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी मोठं विधान केले आहे.



प्रफुल्ल पटेल

युतीत सामील झाल्यानंतर आता आपल्याला ताकद दाखवावी लागेल, तरच हक्काने जागा मागता येतील, असे सूचक वक्तव्य प्रफुल पटेल यांनी केले. ते मुंबईत अजित पवार गटाच्या कार्यक्रमात बोलत होते. अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत मुंबईत आढावा बैठक पार पडली. या बैठकीला अनेक नेते आणि मुंबईतील स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थितीत होते.

यावेळी प्रफुल्ल पटेल म्हणाले, मुंबईत विधानसभेच्या ३६ जागा आहेत, म्हणजेच महाराष्ट्राच्या १५ टक्के जागा केवळ मुंबईत आहेत. हे आपण विसरून चालणार नाही. मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये मिळून विधानसभेच्या ६० जागा आहेत. एवढ्या मोठ्या भागात आपण राष्ट्रवादी काँग्रेसला बळकट केले नाही तर आपण महाराष्ट्रात मजबूत आहोत, असं कसं सांगता येईल. आज आपण युतीमध्ये गेल्यानंतर आपली ताकद दाखवल्याशिवाय कुणी आपल्याला न्याय देईल, अशी अपेक्षा कसं काय बाळगू शकतो. त्यामुळे आपल्या सर्वांना तिथे आपली ताकद उभारावी लागेल.

# ऑस्ट्रेलियाने तिसरी वनडे जिंकली

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या सामन्यात भारताचा ६६ धावांनी पराभव केला. कर्णधार रोहित शर्माने ५७ चेंडूंत ५ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने ८१ धावांची खेळी केली. विराट कोहलीने ६१ चेंडूत ५६ धावा केल्या. त्याने ५ चौकार आणि १ षटकार मारला. तर श्रेयस अय्यरने ४८ आणि रवींद्र जडेजाने ३५ धावांचे योगदान दिले. या पराभवानंतरही टीम इंडियाने ही मालिका २-१ अशी जिंकली. भारताने पहिला एकदिवसीय सामना ५ धावांनी आणि दुसरा सामना ९९ धावांनी जिंकला होता.

मात्र, प्रथमच वनडे मालिकेत कांगारू संघाविरुद्ध क्लीन स्वीप करण्याचे भारतीय संघाचे स्वप्न अधुरेच राहिले. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत सात गडी गमावून ३५२ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ ४९.४ षटकांत २८६ धावांवर गारद झाला. ऑस्ट्रेलियाकडून ग्लेन मॅक्सवेलने ४० धावांत सर्वाधिक ४ बळी घेतले. तर हेझलवूडने दोन बळी घेतले.

तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने सात गड्यांच्या मोबदल्यात ३५२ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून डेव्हिड वॉर्नर (५६), मिचेल मार्श (९६), स्टीव्ह स्मिथ (७४) आणि मार्नस लॅबुशेन (७२) या आघाडीच्या चार फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. भारताकडून जसप्रीत बुमराह (८१ धावांत तीन बळी) आणि कुलदीप यादव (सहा षटकांत ४८ धावांत दोन विकेट) हे यशस्वी गोलंदाज ठरले. मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णाने प्रत्येकी एक विकेट घेतली.

धावांचा पाठलाग करताना भारताने चांगली सुरुवात केली. रोहित आणि वॉशिंग्टन सुंदर (३० चेंडूत १८) यांनी पहिल्या विकेटसाठी ७४ धावांची भागीदारी केली. सुंदर १० व्या षटकात बाद झाला. रोहित आणि कोहली यांनी दुसऱ्या विकेटसाठी ७० धावांची भागीदारी केली. रोहित २१ व्या तर कोहली २७ व्या षटकात बाद झाला. ते मॅक्सवेलच्या जाळ्यात अडकले. श्रेयस अय्यर (४३ चेंडूत ४८, एक चौकार, दोन षटकार) आणि केएल राहुल (३० चेंडूत २६, दोन चौकार) यांनी चौथ्या विकेटसाठी ५२ धावांची भागीदारी केली आणि भारताला २२० च्या पुढे नेले. सूर्यकुमार यादवने (८) निराशा केली. तो अवघ्या आठ धावांवर माघारी परतला. त्यानंतर मॅक्सवेलने ३९ व्या षटकात अय्यरला बोल्ड केले. यानंतर भारताची स्थिती सतत खराब होत गेली. रवींद्र जडेजा (३६ चेंडूत ३५, तीन चौकार, एक षटकार) याला दुसऱ्या टोकाला साथ मिळाली नाही. जोश हेझलवूडने दोन तर मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स, कॅमरून ग्रीन आणि तन्वीर संघाने प्रत्येकी एक विकेट घेत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

# पसरणी घाटात दरड कोसळली

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**वाई :** वाई पाचगणी रस्त्यावर पसरणी घाटात बुधवारी दुपारी दरड कोसळली. यामुळे पाचगणी महाबळेश्वरकडे जाणारी येणारी वाहतूक ठप्प झाली.पसरणी घाटात वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दरड हटविण्याचे काम सुरू केले.



महाबळेश्वर : वाई-पाचगणी रस्त्यावर पसरणी घाटात कोसळलेली दरड

वाई पाचगणी रस्त्यावर पसरणी घाटात बुधवारी दुपारी दत्त मंदिराच्या पुढे वाईहुन पाचगणीला जाण्याच्या मार्गावर रस्त्यावर भली मोठी दरड कोसळली. यामुळे घाटातील वाहतूक ठप्प झाली. पाचगणी व वाई कडे जाणाऱ्या वाहनांच्या मोठया रांगा लागल्या होत्या.मागील काही दिवसांपासून परिसरात हलका व मध्यम पाऊस सुरु आहे. सकाळ पासून जिल्ह्यात पावसाने सर्वत्र दमदार हजेरी लावली आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे डोंगरावरील माती सैल झाल्याने छोटे मोठे दगड आणि माती निसरडे झाले आहेत. त्यातून या मार्गावर दरड कोसळली.

मोठ्या प्रमाणात दरड रस्त्यावर आल्याने वाहतूक संथ गतीने सुरू होती. एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे.दरवर्षी वाई पाचगणी महाबळेश्वर येथे मुसळधार पाऊस पडत असतो. मुसळधार पावसात दरडी कोसळतात. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने मुंबई येथील आयआयटीच्या अभियंत्यांकडून दरड कोसळू नये यासाठी उपाययोजना सुचविण्यास सांगितले आहे.

# शाळा बंद करण्याचा भाजप सरकारचा निर्णय 'तुघलकी' : सुप्रिया सुळे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा आणि त्याचवेळी दारूच्या दुकानांची संख्या वाढविण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकार घेण्याच्या विचारात आहे. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी जोरदार टीका केली. शिक्षणाचा खेळखंडोबा करून मद्यसंस्कृतीचा विकास करणारे 'संस्कारी' राज्यकर्ते महाराष्ट्राने कधी आधी पाहिले नव्हते, असा हल्लाबोल करत, शाळा बंद करण्याचा भाजप सरकारचा निर्णय तुघलकी असल्याची तोफ खासदार सुळेंनी डागली.

एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये ही भूमिका घेत तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने वाड्यावस्त्यांवर सुरू केलेल्या शाळा बंद करण्याचा तुघलकी निर्णय भाजप सरकारने घेतल्याबद्दल, तर दुसरीकडे उत्पन्न वाढविण्यासाठी दारूच्या दुकानांची संख्या वाढविण्याचा प्रस्ताव अर्थखात्याकडे सादर केल्याबद्दल त्यांनी असंतोष व्यक्त केला.

खरे तर राज्यकर्त्यांनी शिक्षण, आरोग्य, कृषी याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. यासाठी नफ्यातोट्याची गणिते मांडायची नसतात. कारण ही गुंतवणूक भावी पिढ्यांसाठीची असते. पण, भाजपला याचा सपशेल विसर पडला आहे, अशी टीका त्यांनी केली. दरम्यान, आपल्याविरुद्ध बातम्या न येण्यासाठी पत्रकारांना चहापाणी करा, त्यांना ढाब्यावर घेऊन जा, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी परवा पक्षाच्या नगर येथील बैठकीत आपल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सांगिल्याची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. त्यावर सडकून टीका करताना केली.












# ईश्वर करो, माझ्यावर निर्णय घ्यायची वेळ न येवो : पंकजा मुंडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भाजपा नेत्या पंकजा मुंडे या पक्षावर नाराज असल्याच्या चर्चा सातत्याने ऐकायला मिळत आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव झाला. त्यानंतर त्यांना पक्षाकडून विधान परिषदेवर पाठवले जाईल अशी चर्चा होती. परंतु, त्यांना तशी संधी मिळाली नाही. तेव्हापासून त्या राज्याच्या सत्तेच्या राजकारणापासून बाजूला ढकलल्या गेल्या. तसेच पंकजा मुंडे यांच्या परळीतील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यावर जीएसटी विभागाने कारवाई केली आहे. कारखान्याची सुमारे १९ कोटींची मालमत्ता जप्त केल्याची माहिती आहे. त्यामुळे पंकजा मुंडे सध्या पक्षनेतृत्वावर नाराज असल्याचं बोललं जात आहे.



पंकजा मुंडे

वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना डबघाईला आल्यामुळे तो वाचवण्यासाठी पंकजा मुंडे यांनी केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, अद्याप त्यांना अमित शाह यांच्याकडून भेटीसाठी वेळ मिळाला नाही. पंकजा मुंडे यांची पक्षात घुसमट होत असल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे पंकजा मुंडे या आगामी काळात वेगळा निर्णय घेऊ शकतात. असा दावा त्यांच्या विरोधकांकडून सातत्याने होत आहे. या सगळ्यावर पंकजा मुंडे यांनी त्यांची भूमिका मांडली.

भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस पंकजा मुंडे यानी नुकतीच टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. यावेळी त्यांना पक्षावरील नाराजीबाबत आणि त्या आगामी काळात वेगळा निर्णय घेऊ शकतात याबाबतच्या चर्चांवर प्रश्न विचारला. या प्रश्नावर पंकजा मुंडे म्हणाल्या, माझ्याविषयी अशा अफवा कोणीही पसरवू नका. मी ईश्वराकडे प्रार्थना करेन की माझ्यावर असा निर्णय घ्यायची वेळ येऊ नये.

पंकजा मुंडे म्हणाल्या, जसे एखादं विवाहबंधन असते, तसेच आपल्या संघटनेशी आपले एक बंधन असते. आपण नकळत एकमेकांना वचने दिलेली असतात, आणाभाका घेतलेल्या असतात, शपथा घेतलेल्या असतात, शब्द दिलेले असतात. आपण एका विचारधारेवर प्रेम केलेले असते. त्यामुळे असा निर्णय एखाद्या व्यक्तीला घ्यावा लागत असेल तर ते त्याच्यासाठी वेदनादायी असते. माझ्यासाठी तर ते प्रचंड वेदनादायी असेल. कारण मी माझ्या वडिलांना या संघटनेत पाहिलं आहे. त्यामुळे या संघटनेशी माझं वेगळं नातं आहे. त्यामुळे असा निर्णय घेण्याची वेळ माझ्यावर येऊच नये, अशी माझी प्रार्थना आहे. ईश्वर करो, माझ्यावर निर्णय घ्यायची वेळ न येवो.